# कामगार कंत्राट, सुरक्षा सेवा, हाऊसकीपिंग व स्वच्छता सेवांसाठी निविदा अर्ज

**International Centre of Excellence in Engineering and Management (ICEEM), Waluj, Chh. Sambhajinagar** येथे कामगार पुरवठा, सुरक्षा सेवा, हाऊसकीपिंग, स्वच्छता व शौचालय देखभाल सेवांसाठी अनुभवी व पात्र संस्थांकडून सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

**निविदा दस्तऐवज:**
निविदा दस्तऐवज संस्थेच्या कार्यालयातून कार्यालयीन वेळेत प्राप्त करता येईल अथवा संस्थेच्या अधिकृत वेबसाइट (www.iceemabad.com) वरून डाउनलोड करता येतील.

**निविदा सादर करण्याचा कालावधी:** जाहिरात प्रकाशित झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत

---

## 1. निविदाधारकाची माहिती

1. फर्म / कंपनीचे नाव : ____________________
2. मालक / संचालकाचे नाव : ____________________
3. संपूर्ण पत्ता : ____________________
4. मोबाईल क्रमांक : ____________________
5. ई-मेल : ____________________
6. GST क्रमांक : ____________________
7. PAN क्रमांक : ____________________
8. EPF नोंदणी क्रमांक : ____________________
9. ESIC नोंदणी क्रमांक : ____________________
10. Labour License क्रमांक : ____________________
11. व्यवसाय स्थापनेचे वर्ष : ____________________
12. अनुभव (वर्षे) : ____________________

### 2. अनुभवाचा तपशील

| अ.क्र. | संस्था / कंपनीचे नाव | सेवा प्रकार | कालावधी (वर्षे) | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| 3 | | | | |

### 3. प्रस्तावित सेवांचा तपशील

कृपया आपण कोणत्या सेवांसाठी निविदा भरत आहात ते नमूद करावे:

| सेवा | होय | नाही |
|---|---|---|
| सुरक्षा सेवा (Security Services) | □ | □ |
| हाऊसकीपिंग सेवा | □ | □ |
| शौचालय स्वच्छता सेवा | □ | □ |
| सामान्य कामगार पुरवठा | □ | □ |
| बागकाम व परिसर देखभाल | □ | □ |

### 4. उपलब्ध मनुष्यबळ

| पद | संख्या |
|---|---|
| सुरक्षा पर्यवेक्षक | |
| सुरक्षा रक्षक | |
| महिला सुरक्षा रक्षक | |
| हाऊसकीपिंग कर्मचारी | |
| स्वच्छता कर्मचारी | |
| कामगार | |
| बागकाम कर्मचारी | |

### 5. कर्मचारी पात्रता

1. सर्व कर्मचारी वय 18 ते 55 वर्षे दरम्यान आहेत का? □ होय □ नाही
2. सर्व कर्मचाऱ्यांची पोलीस पडताळणी झाली आहे का? □ होय □ नाही
3. सर्व कर्मचारी वैद्यकीयदृष्ट्या तंदुरुस्त आहेत का? □ होय □ नाही
4. सर्व कर्मचाऱ्यांना गणवेश व ओळखपत्र उपलब्ध करून दिले जातील का? □ होय □ नाही

**6. आवश्यक कागदपत्रे**

| कागदपत्र | होय | नाही |
|---|---|---|
| GST प्रमाणपत्र | ☐ | ☐ |
| PAN कार्ड | ☐ | ☐ |
| EPF प्रमाणपत्र | ☐ | ☐ |
| ESIC प्रमाणपत्र | ☐ | ☐ |
| Labour License | ☐ | ☐ |
| Shop Act License | ☐ | ☐ |
| अनुभव प्रमाणपत्रे | ☐ | ☐ |
| आयकर विवरणपत्र | ☐ | ☐ |
| बँक तपशील | ☐ | ☐ |

**7. आर्थिक प्रस्ताव**

- **सुरक्षा सेवा**

| पद | मासिक दर (₹) |
|---|---|
| सुरक्षा पर्यवेक्षक | |
| सुरक्षा रक्षक | |
| महिला सुरक्षा रक्षक | |

- **हाऊसकीपिंग सेवा**

| पद | मासिक दर (₹) |
|---|---|
| हाऊसकीपिंग कर्मचारी | |
| स्वच्छता कर्मचारी | |

- **कामगार पुरवठा**

| पद | मासिक दर (₹) |
|---|---|
| अकुशल कामगार | |
| अर्धकुशल कामगार | |
| कुशल कामगार | |



Opp- Bajaj Auto Ltd. Pune Highway, Waluj-Pandharpur, Chh. Sambhajinagar (Aurangabad) - 431136 (MS). Tel: 02402558 123 / 103 / 120.
Web: www.iceemabad.com; Email: director@iceemabad.com

- **बागकाम कर्मचारी**

| पद | मासिक दर (₹) |
|---|---|
| माळी / Garden Staff | |

**8. सुरक्षा ठेव**

मी / आम्ही निवड झाल्यास ₹________________सुरक्षा ठेव जमा करण्यास सहमत आहोत. ☐ होय ☐ नाही

**9. विशेष सुविधा**

1. बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली उपलब्ध आहे का? ☐ होय ☐ नाही
2. कर्मचारी बदलण्याची सुविधा 24 तासांत उपलब्ध करून देऊ शकता का? ☐ होय ☐ नाही
3. सर्व कर्मचाऱ्यांना PPE, हातमोजे, मास्क व सुरक्षा साहित्य उपलब्ध करून देणार का? ☐ होय ☐ नाही

**10. घोषणापत्र:** मी / आम्ही घोषित करतो की:

1. निविदेमध्ये दिलेली सर्व माहिती खरी व अचूक आहे.
2. आमच्या सर्व कर्मचाऱ्यांची पोलीस पडताळणी करण्यात आलेली आहे.
3. शासनाने निश्चित केलेल्या किमान वेतन कायद्याचे पालन करू.
4. EPF, ESIC व इतर सर्व कायदेशीर जबाबदाऱ्या पूर्ण करू.
5. ICEEM संस्थेच्या सर्व अटी व शर्ती मान्य आहेत.
6. निवड झाल्यास निर्धारित वेळेत सेवा सुरू करू.

**11. निविदाधारकाची स्वाक्षरी**

नाव : ________________________________________

पद : ________________________________________

फर्मचा शिक्का : ________________________________________

स्वाक्षरी : ________________________________________

दिनांक : ____ / ____ / 20____ स्थळ : ____________________________

**कार्यालयीन वापरासाठी**

निविदा क्र.: निविदा प्राप्त दिनांक :

आर्थिक निविदा उघडली : होय / नाही तांत्रिक पात्रता : पात्र / अपात्र

निवड स्थिती : निवडले / निवडले नाही अधिकृत स्वाक्षरी :

## कामगार कंत्राट, सुरक्षा सेवा, हाऊसकीपिंग व स्वच्छता सेवांसाठी निविदा अटी व शर्ती

**International Centre of Excellence in Engineering and Management (ICEEM), Waluj, Chh. Sambhajinagar** येथे कामगार पुरवठा, सुरक्षा सेवा, हाऊसकीपिंग, स्वच्छता व शौचालय देखभाल सेवांसाठी अनुभवी व पात्र संस्थांकडून सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

**निविदा दस्तऐवज:**
निविदा दस्तऐवज संस्थेच्या कार्यालयातून कार्यालयीन वेळेत प्राप्त करता येईल अथवा संस्थेच्या अधिकृत वेबसाइट (www.iceemabad.com) वरून डाउनलोड करता येतील.

**निविदा सादर करण्याचा कालावधी:** जाहिरात प्रकाशित झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत

**1. पात्रता निकष**

1. निविदाधारक संस्था शासनमान्य नोंदणीकृत असावी.
2. संबंधित क्षेत्रात किमान 03 वर्षांचा अनुभव असावा.
3. GST, PAN, EPF, ESIC व श्रम विभाग नोंदणी असणे आवश्यक आहे.
4. मागील 03 वर्षांत शैक्षणिक संस्था, उद्योग किंवा कार्यालयांना सेवा पुरविल्याचा अनुभव असावा.
5. संस्थेविरुद्ध कोणतेही फौजदारी किंवा न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नसावे.

**2. आवश्यक कागदपत्रे**

- संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र
- GST प्रमाणपत्र
- PAN कार्ड
- EPF नोंदणी प्रमाणपत्र
- ESIC नोंदणी प्रमाणपत्र
- Shop Act परवाना
- Labour License
- मागील 03 वर्षांचे आयकर विवरणपत्र
- अनुभव प्रमाणपत्रे
- बँक सॉल्व्हन्सी प्रमाणपत्र
- शपथपत्र (Notarized Affidavit)

**3. कामाचा आवाका (Scope of Work)**
**अ) कामगार कंत्राट (Labour Contract)**

1. संस्थेच्या गरजेनुसार अकुशल, अर्धकुशल व कुशल कामगार उपलब्ध करून देणे.
2. बागकाम, देखभाल, स्थलांतर, कार्यक्रम व्यवस्था इत्यादी कामांसाठी मनुष्यबळ पुरविणे.
3. कामगारांचे वेतन, PF, ESIC, बोनस व इतर कायदेशीर जबाबदाऱ्या कंत्राटदाराच्या राहतील.

**ब) सुरक्षा सेवा (Security Services)**

1. प्रशिक्षित व गणवेशधारी सुरक्षा रक्षक उपलब्ध करून देणे.
2. 24x7 सुरक्षा व्यवस्था राखणे.
3. प्रवेशद्वार, पार्किंग, वसतिगृह व इतर परिसरावर देखरेख ठेवणे.
4. अभ्यागत नोंदणी व प्रवेश नियंत्रण राखणे.
5. आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ प्रतिसाद देणे.

**क) हाऊसकीपिंग सेवा (Housekeeping Services)**

1. वर्गखोल्या, प्रयोगशाळा, कार्यालये, कॉरिडॉर, सभागृह व परिसराची स्वच्छता राखणे.
2. कचरा संकलन व योग्य विल्हेवाट लावणे.
3. फर्निचर, काच, जिने व इतर पृष्ठभागांची नियमित स्वच्छता करणे.
4. आवश्यक स्वच्छता साहित्य पुरविणे.

**ड) शौचालय स्वच्छता सेवा (Toilet Cleaning Services)**

1. सर्व शौचालयांची दिवसातून किमान तीन वेळा स्वच्छता करणे.
2. निर्जंतुकीकरण व दुर्गंधी नियंत्रणासाठी योग्य रसायनांचा वापर करणे.
3. साबण, टिश्यू पेपर, हँडवॉश इत्यादींची उपलब्धता सुनिश्चित करणे.
4. स्वच्छता नोंदवही (Cleaning Log Book) ठेवणे.

**4. कर्मचारी संबंधित अटी**

1. सर्व कर्मचाऱ्यांनी ओळखपत्र व गणवेश परिधान करणे आवश्यक राहील.
2. कर्मचारी शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असावेत.
3. बालमजुरीस सक्त मनाई राहील.
4. कर्मचाऱ्यांचे पोलीस पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
5. कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही गैरवर्तनाची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

**5. वेतन व कायदेशीर जबाबदाऱ्या**

1. शासनाने निश्चित केलेल्या किमान वेतनानुसार वेतन देणे बंधनकारक राहील.
2. EPF, ESIC, बोनस, ग्रॅच्युइटी व इतर कायदेशीर लाभ देणे आवश्यक राहील.
3. कामगार कायदे, औद्योगिक सुरक्षा नियम व इतर लागू कायद्यांचे पालन करणे बंधनकारक राहील.
4. संस्थेवर कोणताही आर्थिक किंवा कायदेशीर भार येणार नाही.

**6. सुरक्षा ठेव (Security Deposit)**

1. निवड झालेल्या कंत्राटदाराने **₹50,000/- (रुपये पन्नास हजार फक्त)** सुरक्षा ठेव जमा करणे आवश्यक राहील.
2. करारातील अटींचे उल्लंघन झाल्यास सुरक्षा ठेव जप्त केली जाऊ शकते.



International Centre of Excellence in Engg & MGMT. • Pandharpur

**7. सेवा गुणवत्ता**

1. सेवांची गुणवत्ता समाधानकारक नसल्यास संस्थेस दंड आकारण्याचा अधिकार राहील.
2. वारंवार तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित कर्मचारी बदलणे बंधनकारक राहील.
3. संस्थेच्या सूचनांचे पालन करणे आवश्यक राहील.

**8. तपासणी व देखरेख**

1. संस्थेला कोणत्याही वेळी सेवा तपासण्याचा अधिकार राहील.
2. उपस्थिती नोंदवही व वेतन नोंदी तपासण्यासाठी उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.
3. सेवा गुणवत्तेचा नियमित आढावा घेतला जाईल.

**9. कर्मचारी व सुरक्षा रक्षकांसाठी वय, शारीरिक पात्रता व गणवेश संबंधी अटी:**

**अ) वयोमर्यादा (Age Criteria)**

1. सर्व कामगार, हाऊसकीपिंग कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी व सुरक्षा रक्षक यांचे वय **18 ते 55 वर्षे** दरम्यान असावे.
2. सुरक्षा पर्यवेक्षक (Security Supervisor) यांचे वय 55 **वर्षांपेक्षा जास्त नसावे.**
3. कर्मचारी नियुक्तीपूर्वी आधारकार्ड, जन्मतारीख प्रमाणपत्र किंवा इतर वैध ओळखपत्र सादर करणे आवश्यक राहील.
4. बालमजुरीस (18 वर्षांखालील व्यक्ती) सक्त मनाई राहील.

**ब) शारीरिक पात्रता व आरोग्य (Fitness Criteria)**

1. सर्व कर्मचारी शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असणे आवश्यक राहील.
2. सुरक्षा रक्षकांसाठी वैद्यकीय तंदुरुस्ती प्रमाणपत्र (Medical Fitness Certificate) सादर करणे बंधनकारक राहील.
3. कर्मचारी कोणत्याही संसर्गजन्य किंवा गंभीर आजाराने ग्रस्त नसावेत.
4. आवश्यकतेनुसार संस्था कर्मचारी यांची वैद्यकीय तपासणी करून घेऊ शकते.
5. ड्युटीदरम्यान मद्यपान, तंबाखू, गुटखा किंवा इतर व्यसनाधीन पदार्थांचे सेवन आढळल्यास संबंधित कर्मचारी तात्काळ बदलणे बंधनकारक राहील.

**क) सुरक्षा रक्षकांसाठी विशेष पात्रता**

1. पुरुष सुरक्षा रक्षकांची किमान उंची **165 सें.मी.** व महिला सुरक्षा रक्षकांची किमान उंची **155 सें.मी.** असावी.
2. सुरक्षा रक्षकांना वाचन, लेखन व मूलभूत संवाद कौशल्य असणे आवश्यक राहील.
3. सुरक्षा रक्षकांची पोलीस पडताळणी (Police Verification) झालेली असावी.
4. सुरक्षा रक्षकांना अग्निसुरक्षा (Fire Safety), आपत्कालीन व्यवस्थापन व प्रथमोपचार (First Aid) यांचे प्राथमिक प्रशिक्षण दिलेले असावे.



Opp- Bajaj Auto Ltd. Pune Highway, Waluj-Pandharpur, Chh. Sambhajinagar (Aurangabad) - 431136 (MS). Tel: 02402558 123 / 103 / 120.
Web: www.iceemabad.com; Email: director@iceemabad.com

**ड) गणवेश (Dress Code)**

1. सर्व कर्मचारी ड्युटीदरम्यान स्वच्छ, नीटनेटका व अधिकृत गणवेश परिधान करतील.
2. गणवेशावर संस्थेचे/एजन्सीचे नाव असलेला बॅज किंवा लोगो असावा.
3. सर्व कर्मचाऱ्यांनी फोटोयुक्त ओळखपत्र (ID Card) दृश्यमान ठेवणे बंधनकारक राहील.
4. सुरक्षा रक्षकांनी खालील बाबी अनिवार्यपणे वापराव्यात:
    - अधिकृत गणवेश, सुरक्षा शूज, बेल्ट, कॅप/बेरेट, शिट्टी (Whistle), टॉर्च (रात्रीच्या ड्युटीसाठी)
5. हाऊसकीपिंग व स्वच्छता कर्मचाऱ्यांनी खालील सुरक्षासाहित्य वापरणे आवश्यक राहील:
    - गणवेश , हातमोजे (Gloves) , फेस मास्क,, सुरक्षा बूट, आवश्यकतेनुसार एप्रन

**ई) शिस्त व वर्तन**

1. सर्व कर्मचारी विद्यार्थी, पालक, प्राध्यापक व अभ्यागतांशी नम्र व शिस्तबद्ध वर्तन करतील.
2. अश्लील भाषा, गैरवर्तन, भांडण, धमकी किंवा संस्थेची प्रतिमा मलिन करणारी कोणतीही कृती आढळल्यास संबंधित कर्मचारी तात्काळ हटविणे बंधनकारक राहील.
3. ड्युटीदरम्यान मोबाईल फोनचा अनावश्यक वापर टाळावा.
4. संस्थेच्या परिसरात धूम्रपान, तंबाखू, गुटखा, मद्यपान किंवा कोणत्याही प्रकारचे व्यसन पूर्णपणे प्रतिबंधित राहील.
5. कोणत्याही कर्मचाऱ्याच्या वर्तन, कार्यक्षमता किंवा शिस्तीबाबत तक्रार प्राप्त झाल्यास संस्थेच्या सूचनेनुसार 24 तासांच्या आत संबंधित कर्मचारी बदलणे बंधनकारक राहील.
6. कोणत्याही कर्मचारी बदलासाठी संस्थेची पूर्वपरवानगी आवश्यक राहील.

**10. पोलीस पडताळणी**

1. सर्व सुरक्षा रक्षक, हाऊसकीपिंग व स्वच्छता कर्मचाऱ्यांची पोलीस पडताळणी अनिवार्य राहील.
2. पोलीस पडताळणी अहवाल संस्थेकडे सादर करणे आवश्यक राहील.
3. पडताळणीशिवाय कोणत्याही कर्मचाऱ्यास कामावर ठेवता येणार नाही.

**11. उपस्थिती व बायोमेट्रिक प्रणाली**

1. सर्व कर्मचाऱ्यांची दैनंदिन उपस्थिती बायोमेट्रिक प्रणाली व उपस्थिती नोंदवहीद्वारे आवश्यक राहील.
2. संस्थेला कोणत्याही वेळी उपस्थिती रेकॉर्ड तपासण्याचा अधिकार राहील.

**12. विमा संरक्षण (Insurance)**

1. सर्व कर्मचाऱ्यांचा अपघात विमा (Accidental Insurance) कंत्राटदाराने काढणे आवश्यक राहील.
2. ड्युटीदरम्यान झालेल्या अपघात, दुखापत किंवा मृत्यूसाठी संस्थेला जबाबदार धरता येणार नाही.

**13. दंड तरतूद (Penalty Clause):** खालील बाबींमध्ये दंड किंवा करार समाप्तीची कारवाई करण्यात येईल:

- कर्मचारी / सुरक्षा रक्षक अनुपस्थित
- अस्वच्छ शौचालय/परिसर / स्वच्छतेतील त्रुटी

- I- Card / गणवेशाशिवाय कर्मचारी
- पोलीस पडताळणी नसलेला कर्मचारी
- संस्थेच्या सूचनांचे पालन न करणे, सुरक्षा नियमांचे उल्लंघन
- वेतन, PF किंवा ESIC न भरणे
- कर्मचाऱ्यांचे गैरवर्तन , संस्थेच्या मालमत्तेचे नुकसान

**14. करार कालावधी**

1. कराराचा कालावधी प्रारंभी **01 वर्ष** राहील.
2. समाधानकारक कामगिरीच्या आधारे कराराचे नूतनीकरण केले जाऊ शकते.

**15. करार समाप्ती**

1. कोणत्याही पक्षास 30 दिवसांची लेखी सूचना देऊन करार समाप्त करता येईल.
2. गंभीर नियमभंग झाल्यास संस्था करार तात्काळ रद्द करू शकते.

**16. किमान मनुष्यबळ आवश्यकता (उदाहरण)**

| सेवा | आवश्यक कर्मचारी |
|---|---|
| सुरक्षा रक्षक | 12 |
| सुरक्षा पर्यवेक्षक | 01 |
| हाऊसकीपिंग कर्मचारी | 10 |
| शौचालय स्वच्छता कर्मचारी | 02 |
| सामान्य कामगार | आवश्यकतेनुसार |

**17. देयक अटी (Payment Terms)**

1. प्रत्येक महिन्याचे बिल पुढील महिन्याच्या 5 तारखेपर्यंत सादर करणे आवश्यक राहील.
2. PF, ESIC व वेतन भरण्याचे पुरावे सादर केल्यानंतरच देयक मंजूर केले जाईल.
3. लागू कर कपात (TDS) शासन नियमानुसार करण्यात येईल.

**18. संस्थेचा अधिकार**

1. कोणतीही निविदा स्वीकारणे किंवा नाकारणे हा संस्थेचा विशेष अधिकार राहील.
2. आवश्यकतेनुसार अटी व शर्तींमध्ये बदल करण्याचा अधिकार संस्थेकडे राहील.
3. निविदा प्रक्रियेतील संस्थेचा निर्णय अंतिम राहील.
4. एका किंवा अधिक पुरवठादारांची निवड करण्याचा अधिकार संस्थेकडे राहील.

International Centre of Excellence in Engg. & MGMT. Paegoan Aurangabad